# KOLHAPUR ENGINEERING ASSOCIATION

शिक्षणाच्या भवितव्यासाठी उद्योग आणि विद्यापीठे यांनी एकत्र यावे : डॉ.बी.एम.हिर्डेकर.

सध्यांचे युग तंत्रज्ञानाचे आहे एवढे शिकलो उद्योग उभाकेले, प्रगतीपथावर नेले आता शिकण्यासारखे आणि ऐकण्यासारखे काय आहे असा सध्या अनेकांना पडलेला आहे. परंतु अजूनही शिकण्यासारखे आणि ऐकण्यासारखे नक्कीच आहे. ऐवढे शिकुनही एखादा जॉब मिळत नसेल, काम करता येत नसेल तर सर्वांना याचा जाब विचारला पाहिजे. यश मिळाल्यानंतर जसे फलक लावले जातात तसेच अपयश मिळाल्यानंतरही फलक लावा की, या अपयशासही आंम्ही जबाबदार आहोत अशी वेळ आता आली आहे. शिक्षणाच्या भवितव्यासाठी उद्योग आणि विद्यापीठे यांनी एकत्र येणे आवश्यक आहे असे प्रतिपादन डॉ.बी.एम.हिर्डेकर यांनी केले. कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशने अमृत महोत्सवा निमित्त आयोजित केलेल्या ‘ कालसुसंग, भविष्यवेधी शिक्षण’ या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

अनेक देशात विद्याथ्र्यांचे प्रथम टॅलेंट शोधले जाते आणि नंतर त्याचे टॅपिंग केले जाते असेही आपल्याकडे होणे गरजेचे आहे. भारतामध्ये नउ महिने शिक्षण आणि 12 महिन्याचा पगार दिला जातो याच्यावर विचार व्हायला हवा. इंडस्ट्रीमध्ये तयार झालेले उत्पादन खराब असेल तर रिजेक्ट केले जाते आणि ते दुरूस्ती अगर नविन बनवून द्यावे लागते ही वस्तूस्थिती आहे हया पध्दतीचा वापर शिक्षण क्षेत्रातही व्हायला हवा. शिक्षण क्षेत्रात अजूनही 35 टक्क्यावर समाधान मानून पुढील मुले पुढे जातात. पालक शाळेसाठी, क्लासेससाठी भरमसाठ पैसा खर्च करतात इतके करूनही हवे तसे यश सगळयांनाच मिळत नाही त्यामुळे अपयश मिळालेल्या विद्याथ्र्यांचे काय ? यांचे पैसे परत मिळायला हवे. आज एखादा गुन्हेगार घडला तर याला शिक्षक किंवा आपणही तितकेच जबाबदार आहोत.

चांगले मनुष्यबळ मिळण्यासाठी सर्व प्रयत्न करूनही यात यश मिळत नाही यासाठी शासनाशी संवाद साधायला हवा. चांगली पिढी घडविण्यासाठी याठिकाणी वादही घालायला हरकत नाही. लहानापासून मोठयानाही कसे शिकवायचे असा प्रश्न भारतातच नव्हेतर अमेरिकेसारख्या देशात आजही आहे आणि यावर सातत्याने संशोधनही होत आहे. आधूनिक तंत्रज्ञानामुळे वेगाने कामे होतात. अनेक मुलं एकत्र येतात कुठेतरी पार्टीत सापडतात . हे कसे सापडतात ? ते शिकलेली नाही काय ? अश्या मुलांना वागायंच कसं हे कळत नाही. आज डिग्री तुमचे भांडवल आहे, परंतु नॉलेज आणि एॅटीटयूट काय आहे ? हेही पाहणे गरजेचे आहे.

आज आडानी बाई सांगते माझा मुलाला शिकल्यानंतर सही शिक्याची डिग्री किंवा सर्टीफिकेट नको, तर शिकल्यानंतर याला काय,काय येते ते लिहून द्या. आज इथल्यापेक्षा परदेशात ड्रायव्हरलाही पाचपट पगार आहे, जा म्हटलं की कोण जाणार नाही,इंग्रजीची अडचण आहे, अरे पण यासाठी दोन महिने क्लास लावू शिका ना...परंतु याची तयारी नाही.

प्रत्येक घरांमध्ये पुर्वज्यांनी जे पराक्रमी होते त्यांचा इतिहास एका खोलीत मांडून सातत्याने येणा-या पिढीला याचे ज्ञान द्यावे. आज कोल्हापूरातील किती कॉलेजमध्ये अपडेट केलेली माहीती आहे ?

देशात व परदेशांतही 31 डिसेंबरच्या रात्री पिउन पडलेल्या लोकांना घरी पोचविण्यासाठी खास जॉब आहे आणि प्रत्येक किलोमिटरला रू.1000/- इतके भाडे आहे, अश्या अनेक संधी उपलब्ध आहे याचा आपण शोध घेतला पाहिजे.

आई वडील,मुले शिक्षक यांचा संवाद वाढला पाहिजे तरच नवीन पिढी घडविण्यासाठी मदत होईल. आपल्या मुलाचा कशात रस आहे हे शोधण्यासाठी आपण खुप उशिर करतो.

कार्यक्रमाचे प्रस्ताविकांमध्ये शिवाजी उद्यमनगरच्या यशस्वी प्रवासाबाबतची माहिती अध्यक्ष श्री.सचिन मेनन यांनी दिली. तसेच प्रमुख पाहुण्यांचा शाल,श्रीफळ,स्मृतिचिन्ह,पुष्पगुच्छ देवून मा.अध्यक्ष श्री.सचिन मेनन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्याची ओळख मा.उपाध्यक्ष श्री.हर्षद दलालसोा यांनी करून दिली तर आभार प्रदर्शन श्री.दिनेश बुधले यांनी केले. सूत्र संचालन प्रदीप व्हरांबळे यांनी केले. या चर्चासत्रात सर्व श्री सचिन मेनन,हर्षद दलाल, दिनेश बुधले,प्रसन्न तेरदाळकर,कमलाकांत कुलकर्णी, बाबासो कोंडेकर, अतुल आरवाडे, शाम देशिंगकर, हिंदूराव कामते, अशोकराव जाधव, नलिनी नेने, साधना देशिंगकर, सुर्यकांत बुधले,सुशिल हंजे, डॉ.ए.एम.गुरव, सुरेश मंडलीक, नलीनी नेने, महिला उद्योजिका, विद्याश्र्यी,प्रदीप व्हरांबळे,प्रशांत मोरे,इ.उपस्थित होते.




कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन
बुधले सभागृह
असोसिएशन